रयत शिक्षण संस्था,सातारा

टेंडर निविदा

रयत शिक्षण संस्था विद्यालये, महाविद्यालये व इतर शाखांकरिता ACP बोर्डावर ॲक्रेलिक अक्षरे संस्था लोगोसह बोर्ड तयार करण्याबाबतची निविदा मागवित आहे. त्याचा तपशील संस्थेच्या www.rayatshikshan.edu या संकेत स्थळावरुन डाऊनलोड करुन निविदा फॉर्म घेऊन इच्छुकांनी दि. १८/०९/ २०१८ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत रोख रु. १,०००/- भरुन निविदा सादर करावी.

सचिव,

रयत शिक्षण संस्था,सातारा

# नियम व अटी-

रयत शिक्षण संस्थेची विद्यालये, महाविद्यालये व इतर शाखांकरिता संस्थेच्या शताब्दी उपक्रमाच्या अंतर्गत शाखेच्या नावांचे ACP बोर्डावर ॲक्रेलीक, अक्षरे संस्था लोगोसह एक सारखे बोर्ड तयार करणे कामाबाबतच्या नियम व अटी खालीलप्रमाणे

१. दर सर्व करांसहीत द्यावेत. तयार झालेले बोर्ड संस्थेच्या पाच प्रादेशिक विभागीय कार्यालयात पोहोच करावयाचे आहेत.

२. नमूद केलेल्या अटीप्रमाणे तसेच प्रशासन ज्याप्रमाणे सुचना करतील त्याप्रमाणे पुरवठादाराने काम करावयाचे आहे.

३. साहित्याचे दर प्रति चौ. फूटाचे द्यावयाचे आहेत.

४. निविदेमध्ये नमुद केलेल्या कंपनी ब्रॅडचे मटेरियअल वापरणे बंधनकारक आहे.

५. बयाणा रक्कम म्हणून सचिव रयत शिक्षण संस्था, सातारा यांचे नावे रक्कम रू. ३,००,०००/- (अक्षरी रू. तीन लाख) डिमांड ड्राफ़्टने सोबत द्यावी लागेल.

६. काम समाधानकारक पूर्ण झाले नंतर बयाणा रक्कम ४ महिन्यात परत दिली जाईल.

७. पूर्वी याप्रकारचे काम केलेले असल्याची माहिती निविदा अर्जा सोबत जोडावी.

८. सील बंद निविदेच्या पाकिटावर कामाचे नाव,मोबाईल नंबर, ईमेल आय.डी नमूद करावे.

९. निविदा सादर करताना सील बंद पाकीटात -

अ) सर्व अटी मान्य असलेबाबतचे पत्र

ब) टेंडर फॉर्म पावतीची झेरॉक्स

क) बयाणा रकमेचा डी डी

ड) दर पत्रक

इ) इतर आनुषंगिक माहिती

निविदेसंबंधी चर्चा करण्यासाठी संस्था कार्यालयात हजर राहण्याबाबत निविदा धारकांना नंतर कळविण्यात येईल. सदर वेळी अनुपस्थित राहिल्यास त्यास संस्था प्रशासन जबाबदार राहणार नाही.

१०. अपूर्ण, विहित नमुन्यात नसणारे व सशर्त दरपत्रक स्विकारले जाणार नाही.

११. निविदेच्या अनुषंगाने कोणताही वाद निर्माण झाल्यास इंडियन आरबिट्रेशन ॲक्ट १९४० मधील तरतुदीप्रमाणे संस्था कार्यवाही करेल व आरबिट्रेटरचा निर्णय अंतिम राहील.

१२. वरील सर्व नियम व अटीमध्ये बदल करण्याचा तसेच निविदा अंशतः अथवा पूर्णतः रद्द करणे किंवा नाकारणे अथवा मंजूर करणे हा अधिकार मा.सचिव,रयत शिक्षण संस्था, सातारा यांनी राखून ठेवला आहे.